# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in


०९ जुन, २०२०


☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7276494810 (PRO)


# मुलीस मारहाण करून अत्याचार करणाऱ्या आरोपीस १० वर्ष कारावासाची शिक्षा आणि दंड

पोलीस स्टेशन बल्लारशाह हद्दीत राजेंद्र प्रसाद वार्ड बल्लारशाह येथील फिर्यादी मुलीस मारहाण करून अत्याचार करणाऱ्या आरोपीस ०९/०६/२०२० रोजी **मा. श्री. मोडक सर, कोर्ट क्र. ३ अति. सत्र न्यायाधीश चंद्रपुर** यांनी शिक्षा ठोठावली आहे.

पोलीस स्टेशन बल्लारशाह अंतर्गत राजेंद्र प्रसाद वार्ड येथील रहिवासी फिर्यादी मुलगी ही दिनांक १८/०८/२०१७ रोजी आपल्या घरासमोरील रस्त्यावर बहीणीची वाट पाहत उभी असतांना यातील आरोपी नामे शाहरूख उर्फ धुव्वा मुन्ना शेख वय २३ रा. राजेंद्र प्रसाद वार्ड बल्लारशाह याने तिला एकटे पाहुन तिला जबरीने एका पडीत घरात नेवुन मारहाण करून तिचेवर अत्याचार केला आणि जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. ८३७/२०१७ कलम ३७६(२) एम, ३६७, ३२३, ५०४, ७५ भादंवि सहकलम ३(१)(डब्लु)(आय),३(२)(व्ही),३(२) अ.जा.ज.प्र.कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा तपासात घेतल्यानंतर तत्कालीन **उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर श्री. सुशिलकुमार नायक** यांनी आरोपीस निष्पन्न करून आरोपीविरूध्द सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०९/०६/२०२० रोजी **आरोपी नामे शाहरूख उर्फ धुव्वा मुन्ना शेख वय २३ रा. राजेंद्र प्रसाद वार्ड बल्लारशाह** यास **कलम ३७६(२) एम भादंवि मध्ये १० वर्ष कारावासाची शिक्षा आणि २,०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महिने कारावासाची शिक्षा, कलम ३२३ भादंवि मध्ये ३ महिने कारावासाची शिक्षा व ५००/—रू दंड, न भरल्यास १५ दिवसाची शिक्षा, कलम ५०६ भादंवि मध्ये १ वर्ष कारावासाची शिक्षा व ५००/—रू दंड, न भरल्यास १५ दिवस शिक्षा मा. श्री. मोडक सर, कोर्ट क्र. ३ अति. सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. ए.एस. शेख, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन पोहवा. भगवान मेश्राम, पोलीस स्टेशन बल्लारशाह यांनी काम पाहिले.

———————————————————————————————————